# पवित्र शास्त्रानुसार सर्वसमर्थ देवाबद्दल तुमच्या मुलांना शिकवा

**पौल तिमथी अभ्यास A0f नवशिक्या मेंढपाळांचे प्रशिक्षक, तुम्ही**

**अद्याप वाचला नसेल तर कृपा करून आता वाचा.**

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू, यहोशवाने आज्ञापालन केले, त्याप्रमाणे आपल्या मुलांना आज्ञापालन करण्यास शिकवण्यासाठी आई वडीलांना साहाय्य कर."

लोकांच्या गरजांना अनुरूप कार्यक्रम निवडा.

**1. तुमच्या मुलांना शिकवण्यासाठी प्रार्थना व देवाचे वचन याद्वारे तुमच्या अंत: करणाची तयारी करा.**

**पार्श्वभूमी:** देवाने आपल्या लोकांची ईजिप्तमधील गुलामगिरीतून सुटका केल्यानंतर त्यांनी देवाने अभिवचनाने देऊ केलेल्या भूमित प्रवेश न करून त्याची आज्ञा मोडली. तेथे राहणाऱ्या दुष्ट मूर्तीपूजक लोकांना ते घाबरले. त्यांच्या अविश्वासामुळे पवित्र देवाने त्यांना चाळीस वर्षे रानावनात भटकायला लावले पुढे त्यांनी यार्देन नदी पार केली, ही एक महान ऐतिहासिक घटना होती; कारण शेवटी अभिवचनाने देऊ केलेल्या भूमीमध्ये प्रवेश करण्याचा विश्वास आणि धैर्य देवाच्या लोकांनी मिळवले.

**पाहा यहोशवा 3:14-4:6 मध्ये**

- देवाने आपल्या लोकांना यार्देन नदीजवळ धोंडयांची रास करा असे का सांगितले? *(उत्तर: यहोशवा 4:6-7 वल्हांडणाच्या भोजनाप्रमाणेच धोंडेही, देवाने केलेल्या महान अद्‌भुत कृत्यांची मुलांना आठवण करून देतील. तुलना करा निर्गम 12:26-27)*
- कोणते इस्राएल लोक प्रथम यार्देन नदीत गेले याचे महत्व काय? *(उत्तर: यहोशवा 3:14 कराराचा पवित्र कोश वाहून नेणारे याजक प्रथम गेले. हे देवाच्या समक्षतेचे प्रतिक आहे. यातून देव त्यांच्यापुढे गेला हे दिसते येशूही असाच आमच्यापुढे जातो आणि आमच्या अभिवचनाने देऊ केलेल्या भूमीची स्वर्गाची वाट सुकर करतो.)*
- कराराचा कोश वाहून नेणाऱ्या याजकांनी नदीत पाय ठेवताच काय घडले? *(यहोशवा 3:15)*
- बारा प्रमुखांनी नदीच्या मध्यभागातून काय उचलून घेतले? *(यहोशवा 4:3)*
- प्रमुखांनी नदीतून घेतलेले धोंडे कोठे ठेवले? *(यहोशवा 4:8)*



मुलांना ख्रिस्ती सूचना द्या आणि शिस्त लावा.

- मुलांना वडीलांनी त्यांना बरेचसे शिक्षण द्यावे (इफिस 6:4)
- दररोज मुलांना बरोबर घेऊन प्रार्थना व पवित्र शास्त्राचा अभ्यास करा (अनुवाद अध्याय 6 व 7)

- देवाचे वचन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्त करा (स्तोत्र 78:3–7)
- मुलांना प्रत्यक्ष देवाच्या वचनातून थेट शिक्षण द्या (अनुवाद 31:12) त्यांना पवित्र शास्त्रातील कथावृत्तांत्त सांगा.
- लहान लहान मुलांना कृती करू द्या. त्यांना नोहाविषयी सांगा. मग ते प्राण्यांचे हावभाव करतील. ससे उडया मारतात, सिंह गर्जना करतात
- लहान मुले फक्त थोडाच वेळ शांतपणे ऐकू शकतात म्हणून त्यांना फार मोठे वा दिर्घ कथावृत्तांत्त एकदम सांगू नका.
- मोठया मुलांनी लहान मुलांना शिक्षण द्यावे. एकाच वयोगटाच्या मुलांचे गट करणे टाळा.
- मोठया मुलांनी पवित्र शास्त्रातील कथावृत्तांत्त नाट्यरूपाने दाखवावेत तसेच खेळ खेळावेत.
- मुलांनी मोठया माणसांबरोबर गंभीर बाबींवर प्रार्थना करावी. एज्रा 10:1; 2इतिहास 20:12–13.
- मुलांनी पवित्र विधी आणि संस्कारांमध्ये मोठया माणसांबरोबर सहभागी व्हावे, नहेम्या 12:43.
- उपासनेमध्ये मुलांनी मोठया माणसांबरोबर देवाची स्तुती करावी, स्तोत्र 148:13–14; मत्तय 21:15–16.
- येशूची शिकवण मुलांनी मोठया माणसांबरोबर बसून ऐकावी, मत्तय 14:21.
- मुले अयोग्य वर्तन करतात तेव्हा त्यांना रागाने नाही तर प्रेमाने ताळयावर आणा, नीती 23:13; इब्री 12:6–11.
- मुलांना चिरडीला आणू नका आई वडील किंवा मुलांचा द्वेष केल्याने शाप मिळतो, इफिस 6:1–4; मलाखी 4:6.
- निरागस मुलांकडून अपराधी गोष्टी करून घेण्याचे टाळा मत्तय 18:1–6.
- येशूची प्रीती आणि क्षमाशीलता याची मुलांना खात्री द्या, मार्क 10:13–16.
- तुम्ही तुमच्या मुलांना शिस्त लावत असाल तरच पाळकीय देखभाल करणारे वडील म्हणून सेवा करा, 1 तीमथ्य 3:4–5.

**2. आठवडयातील कार्यक्रमांचे सहकाऱ्यांच्या बरोबर नियोजन करा.**

- आई वडीलांची भेट घेऊन त्यांनी मुलांना घरी कसे शिकवावे हे सांगा.
- भाग 1 मधील मार्गदर्शकतत्त्वांचा उपयोग करून मुलांना शिक्षण देणाऱ्यांना सूचना द्या.
- ख्रिस्तीतर कुटुंबांना त्यांच्या मुलांना कार्यक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी आमंत्रित करा. ह्या कार्यक्रमांमुळे त्यांना आनंद मिळेल.

**3. आगामी उपासना सभेचे कर्यक्रम सहकाऱ्यांच्या साहाय्याने ठरवा.**

देवाने आपल्या लोकांना यार्देन नदीच्या बाजूला धोंडयांची रास करायला का सांगितले ते स्पष्ट करा (पाह भाग 1)

मुलांना ख्रिस्ती शिक्षण व शिस्त कशी लावायची हे स्पष्ट करा (पाह भाग 1)

यार्देन नदी ओलांडणे ह्या कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा. मुलांची मदत घ्या.

- पौढांनी **निवेदक यहोशवा** आणि **दगड वाहणारे** ह्या भूमिका कराव्यात दगड वाहणाऱ्यांनी धोंडे मध्यभागी रचून ठेवावेत.
- मुलांनी इस्राएल लोक आणि चार याजक (मोठा खोका वाहा किंवा तसा अभिनय करा) ह्या भूमिका कराव्यात.

**निवेदक:** कथावृत्तांताचा पहिला भाग सांगा (यहोशवा 3:14–17). मग म्हणा, "अभिवचनाने देऊ केलेल्या प्रदेशात प्रवेश करताना यहोशवा इस्राएल लोकांना काय म्हणतो ते ऐका."

**यहोशवा:** "आपण यार्देन नदी ओलांडून पलिकडे जाणार आहोत नदी दुथडी भरून वाहात असली तरी देव आपल्याला कोरडया भूमीवरून नेईल. तो काय करतो ते पाहा. याजकहो, देवाच्या कराराचा कोश उचला आणि पाण्यात उतरा."

**चार याजक:** जिथे धोंडे रचून ठेवले आहेत तिथे कोश डोक्यावर उचलून न्या. आणि म्हणा, "त्या वरच्या प्रवाहाकडे पाहा! पाण्याची रास तयार झाली!" (धोडे ओलांडून 'नदी' पार करा)

**इस्राएल लोक:** (कितीही असावेत): याजकांच्या मागून नदी पार करा. मग म्हणा, "पाहा जमीन कोरडी आहे!" "कोरडया भूमीवरून आपण चालत आहोत!"

**दगड वाहणारे व यहोशवा:** मुलांच्या मागून नदीतून जा पण धोंडे उचलू नका म्हणा, "देवाने पाणी थांबवून ठेवले आहे!" "हा आद्‌भुत चमत्कार आहे!" "देव आम्हांला मदत करीत आहे!"

**निवेदक:** यहोशवा 4:1–7 मधून कथावृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा "यहोशवा इस्राएलाच्या बारा वंशांच्या प्रमुखांना काय सांगतो ते ऐका."

**यहोशवा:** "आता प्रत्येकजण नदीतून इकडे आला आहे. तेव्हा तुमच्यातील बारा जणांना निवडा. ते नदीच्या मध्यभागातून मोठे धोंडे इकडे घेऊन येतील. ह्या धोंडयांमुळे आज देवाने केलेला अद्‌भुत चमत्कार आपल्या मुलांना समजेल."

**दगड वाहणारे:** धोंडे आणा ते जड असल्याचा अभिनय करा. याजक उभे आहेत तिथे ते धोंडे रचून ठेवा.

**इस्राएल लोक:** "ह्या धोंडयांच्या राशीचा अर्थ काय आहे?"

**यहोशवा:** "देवाने आज तुमच्यासाठी काय केले त्याचे स्मरण ही धोंडयांची रास तुम्हांला करून देईल."

**निवेदक:** नाटिका संपल्याचे सांगून मदत करणाऱ्यांचे आभार माना.

आम्हांला आणखी कोणत्या गोष्टी देवाच्या कार्याची आठवण करून देतात याची उदाहरणे सांगून चर्चा करा. विश्वासणाऱ्यांनी उदाहरणे द्यावीत.

मुलांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करावेत.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी लूक 11:10–13 वाचा देवाने आमच्या स्वर्गीय पित्याने आम्हांला आपल्या मुलांना प्रभुभोजन ही दिलेली एक चांगली देणगी आहे हे स्पष्ट करून सांगा.

**पाठ करा** इफिस 6:4

दोन किंवा तीन जणांचे गट करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. एकमेकांना प्रोत्साहन द्या तसेच घरी व उपासनेच्या दरम्यान मुलांना शिकवण्यासाठीच्या योजनांना मंजुरी द्या.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net